क्रमाक :- १२३

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक ०९ जुलै, २०२६/ आषाढ १८, शके १९४८

### अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याबाबत कार्यपध्दती

### (म.वि.स. नियम २१४)

**समिति प्रमुख** : (किंवा समितीचे कोणतेही सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय सदस्यांची विधेयके आणि ठराव समितीचे **चौथे** प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार,दि.१० जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना व अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता समितीची बैठक झाली.

अशासकीय कामकाजासाठी एकूण अडीच तासाचा वेळ उपलब्ध आहे. त्यापैकी विधानसभेकडे पुर:स्थापनार्थ असलेल्या ०४ अशासकीय विधेयकांना ०६ मिनिटे तसेच शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजात विचारार्थ दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या ०३ अशासकीय विधेयकांना २४ मिनिटे व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ पुढीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र.४१ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| २ | श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र.२९ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ३ | श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र.८९ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ४ | श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स यांचा ठराव क्र.५७ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ५ | श्री.राजेश बकाने, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४९ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ६ | श्री. साजिद खान पठाण, वि.स.स. यांचा ठराव क्र.७८ | २० मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

उपरोक्त शिफारशी सभागृहाने गुरुवार, दिनांक ०९ जुलै, २०२५ रोजी संमत केल्या.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ९ जुलै, २०२६**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
४) संगणक कक्ष (वेबसाईट) व एमकेसीएल कक्ष